# प्रकरण पाचवे

# सारांश आणि अनुमान

# प्रकरण पाचवे

## सारांश आणि अनुमान

मागील प्रकरणात संकलित माहितीचे विश्लेषण , अर्थनिर्वचन व निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. तर प्रस्तुत प्रकरणात संशोधिकेने संशोधनाचा सारांश, अनुमान व अनुमानांची चर्चा केली आहे.

पाठयपुस्तक हे अध्ययन अध्यापनाचे एक महत्वाचे साधन आहे. मराठी विषय म्हणजे विद्यार्थ्यांचे अभिव्यक्तीचे माध्यम होय. मराठी विषयाच्या म्हणजेच आपल्या मातृभाषेच्या सहाय्याने विद्यार्थी आपल्या सृजनशील विचारांची देवाणघेवाण करतो.

विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होण्यासाठी, त्यांची विचार प्रक्रिया विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेस वाव मिळण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मूल्यांची रूजवणूक होण्यासाठी मराठी विषयाची रचना सामाजिक ज्ञानरचनावादानुसार करणे आवश्यक आहे. केवळ पुस्तकी शिक्षण न देता विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे. शिक्षक - विद्यार्थी - समाज आंतरक्रिया घडवून आणणे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक - सांस्कृतिक मूल्यांची रूजवणूक करणे. विद्यार्थ्यांच्या विचारप्रक्रियेस चालना देणे या बाबी सामाजिक ज्ञानरचनावादात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्याकरिता सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकानुसार जर मराठी पाठयपुस्तकांची रचना केली तर पाठयपुस्तकांची उपयुक्तता वाढेल. म्हणून इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकाचा अभ्यास सामाजिक ज्ञानरचनावादानुसार करण्यात आला आहे. याकरिता पाठयपुस्तकांचे विश्लेषण करून मतावलीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात आले.

## ५.१ संशोधन सारांश

### समस्या विधान

इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाचा सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अभ्यास.

### संशोधन विधानातील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

**इयत्ता नववी :**

**संकल्पनात्मक व्याख्या**

**इयत्ता**

औपचारिक शिक्षणामध्ये एकूण शिकवायचा अभ्यासकम काही विभागात विभागला जातो. प्रत्येक विभागात किती विषय, त्याचे प्रमाण काय व त्याचा दर्जा काय आहे हे एकदा ठरले की तो एक साचा तयार होतो व ती एक अभ्यासाची इयत्ता ठरते.

(सोहोनी, शं.कृ. (१९९३).शैक्षणिक टीपाकोश.पृष्ठ क .५९)

**नववी**

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सुचविलेल्या १० + २ + ३ या आकृतीबंधातील + १० या स्तरावरील इयत्ता नववी हा वर्ग.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

(सोहोनी, शं.कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश.पृष्ठ क.५८७)

**इयत्ता नववी**

**कार्यात्मक व्याख्या**

१० + २ + ३ या आकृतीबंधानुसार + १० या माध्यमिक स्तरावरील नववी चा वर्ग म्हणजे कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता नववीचा वर्ग होय.

**मराठी पाठयपुस्तक**

**संकल्पनात्मक व्याख्या**

**मराठी**

मराठी भाषा ही मुख्यतः आज महाराष्ट्र राज्य या नावाने ओळखल्या जाणा-या विस्तीर्ण प्रदेशात बोलली जाते.

(जोशी, एल. (१९८५). मराठी विश्वकोश खंड -१२, पृष्ठ.क.११९७)

**पाठयपुस्तक**

एखाद्या विषयाचे शिकविण्यास आवश्यक तसेच नुसत्या वाचनाने, विशिष्ट पातळीवरील विद्यार्थ्यास आकलन न होणारे असे पुस्तक म्हणजे पाठयपुस्तक होय.

(सोहोनी, शं.कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश. पृष्ठ क.२४१)

The devotion of time and attention to acquiring knowledge on an academic subject, especially by mean of book.

(**Source:**Elizabeth, J. J. (2001). The New Oxford American Dictionary. page.no.1690)

**कार्यात्मक व्याख्या**

**मराठी पाठयपुस्तक**

मराठी माध्यमातील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्मित व प्रकाशित केलेले इयत्ता नववीचे मराठी पाठयपुस्तक होय.

**सामाजिक ज्ञानरचनावाद**

**संकल्पनात्मक व्याख्या**

**Social / सामाजिक**

In its broder sense, pertaining to the interaction of organism's in group: in its narrower sense. Descriptive of the development of an individual ability to get along with others.

( Good, C. V. (1973). Dictionary of Education. page. No. 538)

**रचनावाद/ Constructivism**

Constructivism is a Philosophical position that views knowledge as the outcome of experience mediated by one's own prior knowledge and the experience of others.

(**Source** : University of Colarado. (1957). Definition of Constructivism.)

**संकल्पनात्मक व्याख्या**

**सामाजिक ज्ञानरचनावाद/ Social Constructivism**

Social Constructivism is a sociological theory of knowledge that applies the general philosophical constructivism in to the social settings where in group construct knowledge for one another collaborative creating a small culture of shared artifacts with shared meanings.

(**Source**:Wikipedia The Free Encyclopedia. (2010). Lev Vygotsky)

**सामाजिक ज्ञानरचनावाद**

**कार्यात्मक व्याख्या**

इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकातून विद्यार्थी सामाजिक आंतरक्रियेद्वारे अध्ययनार्थ्यांमध्ये ज्ञाननिर्मिती होण्यासाठी पाठयपुस्तकांत दिलेल्या पाठयघटकातून (पाठपरिचय, आशय, शब्दार्थ, स्वाध्याय, व्याकरण, भाषाभ्यास, वाचन, उपक्रम, संवाद कौशल्य) प्रतिबिंबित होणा-या सामाजिक ज्ञानरचनावादाच्या (सृजनशीलता, स्पष्टता, सामाजिक वाटाघाटी, आंतरक्रियात्मक, नवोपक्रम, चिन्हव्यवस्था, ऐतिहासिक संदर्भ, बोधात्मक साधने, विद्यार्थी केंद्रित, मूल्ये व तत्वे यांचे स्पष्टीकरण, तार्किकता, संकल्पनाधारित, मानवी मानसशास्त्रीय साधने, अध्ययन उद्दिष्टांची निर्मिती, समवाय, अर्थपूर्ण संदर्भ, सहकार्यात्मक लेखन, सामाजिक संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ, राजकीय संदर्भ, सृजनशील विचार, अध्ययनार्थी समाजामध्ये सामाजिक जाणिव, उद्गामी विश्लेषण, सामाजिक कौशल्ये, बोधात्मक ज्ञान, सामूहिक कार्ये, नेतृत्व, मूळ बाबी, स्त्रोत, उगम, विमर्षी विचार, मुक्त प्रश्न, पृच्छाधारित)

इत्यादी घटक पाठयपुस्तकातून प्रतिबिंबित होण्याबाबत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे म्हणजे सदर संशोधनासाठी सामाजिक ज्ञानरचनावाद होय.

**संकल्पनात्मक व्याख्या**

**अभ्यास**

अभि + आस = बसणे या संस्कृत शब्दाचा अर्थ भोवती बसून शिकणे. गुरूच्या सानिध्यात बसून अभ्यास करण्याची पद्धत.

(सोहोनी, शं.कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश. पृष्ठ क. (२२))

**कार्यात्मक व्याख्या**

इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकातील समाविष्ट घटकांचा (पाठपरिचय, आशय,शब्दार्थ, स्वाध्याय, व्याकरण, भाषाभ्यास, वाचन, उपक्रम, संवाद कौशल्य) यांचा सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अभ्यास करणे होय.

**संशोधनाची उद्दिष्टये**

१.सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांचा शोध घेणे.

२. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाचे सामाजिक ज्ञानरचनावादानुसार विश्लेषण करणे.

३. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या बाहयांगातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

४.इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या पाठपरिचयातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबावतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

५. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या आशयातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबावतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

६. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या शब्दार्थातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

७. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या स्वाध्यायातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

८. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या व्याकरणातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

९. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या भाषाभ्यासातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

१०. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या वाचनातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

११. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या उपक्रमांतून सामाजिकज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

१२. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या संवादकौशल्यांतून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

१३. पाठयपुस्तक मंडळ यांना सामाजिक ज्ञानरचनावादानुसार पाठयपुस्तक निर्मिती विषयी व पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अध्ययन पद्धतीची कार्यवाही करण्यासाठी सूचना देणे.

**संशोधनाची गृहितके**

१. ज्ञानाधिष्ठित समाजासाठी समाजिक ज्ञानरचनावादाची गरज आहे.

२. सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्याद्वारे प्रकाशित झालेल्या मराठी माध्यमातील इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाचा सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अभ्यास करण्यात आलेला नाही.

**संशोधनाची परिमर्यादा**

१. सदर संशोधन हे इयत्ता नववी मराठी विषयापुरते मर्यादित आहे.

२. सदर संशोधन हे सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापुरते मर्यादित आहे.

३. सदर संशोधन हे कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांपुरते मर्यादित आहे.

**संशोधनाची मर्यादा**

१. कोल्हापूर शहरातील सर्व माध्यमिक शाळांतील इयत्ता नववीला मराठी विषयाचे अध्यापन करणा-या शिक्षकांकडून सामाजिक ज्ञानरचनावाद मतावलीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करावयाचे होते पण एकूण नमुन्यातील ५२ शाळांपैकी फक्त ३० (५२%) शाळांतील शिक्षकांनी मतावलीस प्रतिसाद दिला.

२. सामाजिक ज्ञानरचनावाद शिक्षक मतावलीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करताना ब-याच शिक्षकांना सामाजिक ज्ञानरचनावादाची सखोल संकल्पना स्पष्ट करावी लागली.

**संशोधनाचे महत्व**

एकविसाव्या शतकातील समाज हा ज्ञानाधिष्ठित समाज आहे. या समाजात ज्ञानामध्ये सतत बदल होत आहे. समाजाच्या प्रगतीमध्ये ज्ञानाला अनन्यसाधारण महत्व आहे. आजच्या शिक्षणप्रकियेत शिक्षक हा सुविधादाता, मार्गदर्शक बनला आहे व विद्यार्थी स्वत: ज्ञानाची निर्मिती करतो आहे. या प्रकियेत त्याच्या वैयक्तिक विचारांना व कृतींना मर्यादा पडतात. विद्यार्थ्यांच्या विचारांची व कृतींची व्यापकता वाढविण्यासाठी सामाजिक ज्ञानरचनावादाची गरज आहे. म्हणूनच पाठयपुस्तकात सामाजिक ज्ञानरचनावादाचा समावेश केला तर विद्यार्थ्यांच्या विचारास चालना मिळेल, अध्ययन अध्यापनात समुदायाचा सहभाग वाढेल, सहकार्याची भावना वाढीस लागेल. म्हणून सदर संशोधन महत्वाचे वाटते.

सामाजिक ज्ञानरचनावादानुसार पाठयपुस्तक निर्मिती करण्याकरिता सदर संशोधन महत्वाचे आहे. तसेच शिक्षक, पालक यांच्यामध्ये सामाजिक ज्ञानरचनावादा बद्दल जाणीव निर्माण करण्यासाठी पाठयपुस्तकाची मदत होईल. तसेच सामाजिक ज्ञानरचनावादानुसार उपकम, कार्यनीतींचा पाठयपुस्तकात समावेश केला तर विद्यार्थी कृतीशील बनेल म्हणून सदर संशोधन महत्वाचे वाटते.

**संशोधनाची व्याप्ती**

१.सदर संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववी चे विद्यार्थी, विषयशिक्षक व पाठयपुस्तक निर्मिती मंडळ यांना लागू पडतील.

२.सदर संशोधनाचे निष्कर्ष मराठी विषयाच्या पाठयपुस्तक निर्मितीसाठी लागू पडतील.

३.सदर संशोधनाचे निष्कर्ष इतर विषयांच्या पाठयपुस्तक निर्मितीसाठी लागू पडतील.

**उद्दिष्टानुसार संशोधनाची कार्यवाही**

प्रस्तुत संशोधनाचे कार्यवाही निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसार करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे

**उद्दिष्ट क्र.१ सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांचा शोध घेणे.**

या उद्दिष्टाच्या साध्यतेकरिता संशोधकाने सामाजिक ज्ञानरचनावादावर आधारित उपलब्ध संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा घेतला यामध्ये पानसे, र.(२०१०). रचनावादी शिक्षण, एन.सी.ई.आर.टी (२००६) कन्स्ट्रक्टिव्हिस्ट ॲप्रोचेस टू टिचिंग ॲण्ड लर्निंग, सुपे, टी.एन(२०१०) शिक्षण संक्रमण, स्मिथ, जे(२००१) मॅडेलिंग द सोशल कन्स्ट्रक्शन ऑफ नॉलेज इन इ. एल. टी. टिचर एज्युकेशन, विकीपीडीया द फ्री इनसायक्लोपिडीया.(२०१२). सोशल कन्स्ट्रक्टिव्हिझम, किम, बी (२००६). सोशल कन्स्ट्रक्टिव्हिझम, स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यू यॉर्क (२००६). टूवर्डस् सोशल कन्स्ट्रक्टिव्हिझम इन प्रि सर्व्हिस एज्युकेशन इ. साहित्य व संशोधनाच्या आढाव्यातून सामाजिक ज्ञानरचनावादाच्या सृजनशीलता, स्पष्टता, सामाजिक वाटाघाटी, आंतरक्रियात्मक, नवोपक्रम, चिन्हव्यवस्था, ऐतिहासिक विकास, बोधात्मक साधने, विद्यार्थी केंद्रित, मूल्ये व तत्वे यांचे स्पष्टीकरण, तार्किकता, संकल्पनाधारित, मानवी मानसशास्त्रीय कारणे, अध्ययन उद्दिष्टांची निर्मिती, समवाय, अर्थपूर्ण संदर्भ, सहकार्यत्मक लेखन, सामाजिक संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ, राजकीय संदर्भ, सृजनशील विचार, अध्ययनार्थी समाजामध्ये सामाजिक जाणिव, उद्गामी विश्लेषण, सामाजिक कौशल्ये, बोधात्मक ज्ञान, सामूहिक कार्ये, नेतृत्व, मूळ बाबी, स्त्रोत, उगम, सामग्रीवर आधारित निर्णय घेणे, विमर्षी विचार, प्रासंगिक नोंदी अनुभव, पृच्छाधारित,

मुक्त प्रश्न, पाठयपुस्तक उपक्रम, अनुदेशन प्रणाली आरेखन, एकमेवद्वितीय, विशिष्ट संकल्पनेचे सादरीकरण, स्वयंनिर्देशित, समतोलपणा, अध्ययन उदिद्ष्टांची निर्मिती, प्रासंगिक नोंदी अनुभव, विमर्षी प्रकियेचे पोषण, सामुग्रीवर आधारित निर्णय घेणे, नेतृत्व इ सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांविषयी माहिती मिळवली. या घटकांवर आधारित सामाजिक ज्ञानरचनावाद घटक निश्चिती पडताळासूची मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केली व सामाजिक ज्ञानरचनावाद घटकांची ५ तज्ज्ञांकडून निश्चिती करून घेण्यात आली. (परिशिष्ट 7)

**उद्दिष्ट क्र. २. इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाचे सामाजिक ज्ञानरचनावादानुसार विश्लेषण करणे.**

या उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता तज्ज्ञांकडून सामाजिक ज्ञानरचनावादाचे सृजनशीलता, स्पष्टता, सामाजिक वाटाघाटी, आंतरक्रियात्मक, नवोपक्रम, चिन्हव्यवस्था, ऐतिहासिक संदर्भ, बोधात्मक ज्ञान, विद्यार्थी केंद्रित, मूल्ये व तत्वे यांचे स्पष्टीकरण, तार्किकता, संकल्पनाधारित, मानसशास्त्रीय कारणे, समवाय, अर्थपूर्ण संदर्भ, सहकार्यत्मक अध्ययन, सामाजिक संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ, राजकीय संदर्भ, सृजनशील विचार, अध्ययनार्थी समाजामध्ये सामाजिक जाणीव, उद्गामी विश्लेषण, सामाजिक कौशल्ये, सामूहिक कार्ये, मूळ बाबी, स्त्रोत, उगम, विमर्षी विचार, पृच्छाधारित, मुक्त प्रश्न इ. सामाजिक ज्ञानरचनावादाचे घटक निश्चित करून घेतले व या निश्चित केलेल्या समाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांच्या सहाय्याने इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकाचे विश्लेषण करण्यात आले. (परिशिष्ट - 3) हे विश्लेषण ५ तज्ज्ञांकडून (परिशिष्ट - 7)तपासून घेण्यात आले.

**उद्दिष्ट क्र. ३ . इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या बाहयांगातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.**

या उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकाचा आकार, किंमत, मलपृष्ठ, मुखपृष्ठ, चित्रे, अनुक्रमणिका व प्रस्तावनेत दिलेला आशय, पाठयपुस्तकाची बांधणी सामाजिक ज्ञानरचनावादास अनुसरून आहे का याचा अभ्यास करण्यासाठी शिक्षक मतावली

तयार करण्यात आली. (परिशिष्ट - 4) तयार केलेली मतावली मार्गदर्शकांकडून तपासून घेऊन योग्य ते बदल करून पाच तज्ज्ञांकडून तपासून घेतली (परिशिष्ट - 7) तज्ज्ञांनी सांगितलेल्या सूचनांनुसार मतावलीत बदल केला व अंतिम मतावली तयार केली. (परिशिष्ट - 4 )

**उद्दिष्ट क्र ३ ते १२ इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या पाठपरिचयातून, आशयातून, शब्दार्थातून, स्वाध्यायातून, व्याकरणातून, भाषाभ्यासातून, वाचनातून, उपक्रमांतून, संवाद कौशल्यांतून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.**

या उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमाच्या ५२ माध्यमिक शाळांची निवड करण्यात आली. (परिशिष्ट - 5) या शाळेतील प्रत्येकी एका मराठी विषय शिक्षकांना प्रत्यक्ष भेटून शिक्षक मतावली भरून घेतली. एकूण ३० शाळातील ३० (५७.६९%) विषय शिक्षकांनी या मतावलीस प्रतिसाद दिला आहे. (परिशिष्ट - 5) तर इतर २२ (४२.६६%) शाळांनी या मतावलीस प्रतिसाद दिला नाही. या मतावलीतून प्राप्त माहितीचे संकलन करून निष्कर्ष काढण्यात आले. सदर संशोधनात माहितीच्या विश्लेषणाकरिता टक्केवारी या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे.

**उद्दिष्ट क्र.१३. पाठयपुस्तक मंडळ यांना सामाजिक ज्ञानरचनावादानुसार पाठयपुस्तक निर्मिती विषयी व पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अध्ययन पद्धतीची कार्यवाही करण्यासाठी सूचना देणे.**

सदर संशोधनात आढळून आलेल्या निष्कर्षावरून पाठयपुस्तक निर्मिती मंडळ यांना पाठयपुस्तक निर्मितीविषयी व शिक्षक व पालक यांना सामाजिक ज्ञानरचनावाद अध्ययन कार्य वाही करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. त्या पान क्रमांक ३०२ -३०४ यावर आहेत.

## ५.२ अनुमान आणि चर्चा

### उद्दिष्ट क्र.१ सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांचा शोध घेणे.

सामाजिक ज्ञानरचनावादामध्ये सृजनशीलता, स्पष्टता, सामाजिक वाटाघाटी, आंतरक्रियात्मक, नवोपक्रम, चिन्हव्यवस्था, ऐतिहासिक संदर्भ, बोधात्मक ज्ञान, विद्यार्थी केंद्रित, मूल्ये व तत्त्वे यांचे स्पष्टीकरण, तार्किकता, संकल्पनाधारित, मानसशास्त्रीय साधने, समवाय, अर्थपूर्ण संदर्भ, सहकार्यत्मक अध्ययन, सामाजिक संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ, राजकीय संदर्भ, सृजनशील विचार, अध्ययनार्थी समाजामध्ये सामाजिक जाणीव, उद्‌गामी विश्लेषण, सामाजिक कौशल्ये, सामूहिक कार्ये, मूळ बाबी, स्त्रोत, उगम, विमर्षी विचार, पृच्छाधारित, मुक्त प्रश्न इ. घटकांचा समावेश होतो.

जामुनी, एस.एस. (२०१३). इयत्ता नववीच्या इतिहास पाठयपुस्तकाचा सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अभ्यास या संशोधनातील सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांमध्ये बोधात्मक ज्ञान, सहकार्यात्मक अध्ययन, कृतीशील अध्ययन, विमर्षी विचार, सामाजिक संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ, सामजिक आंतरक्रिया, सृजनशीलता, गटचर्चा, वर्गचर्चा, प्रकल्प पद्धती, समस्या निराकरण कृती, लोकशाही वातावरण, पूर्वज्ञानाशी संबंध, वास्तविक अनुभव, सहअध्ययन इ. घटकांचा समावेश होतो या निष्कर्षाशी मिळताजुळता आहे.

### उद्दिष्ट क्र.२ इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाचे सामाजिक ज्ञानरचनावादानुसार विश्लेषण करणे.

इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकाचे सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकानुसार विश्लेषण केल्यानंतर असे दिसून येते की इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकात सृजनशीलता, स्पष्टता, सामाजिक वाटाघाटी, सामाजिक आंतरक्रिया, नवोपक्रम, चिन्हव्यवस्था, ऐतिहासिक संदर्भ, बोधात्मक ज्ञान, विद्यार्थी केंद्रित, मूल्ये व तत्वे यांचे स्पष्टीकरण, तार्किकता, संकल्पनाधारित, मानसशास्त्रीय साधने, समवाय, अर्थपूर्ण संदर्भ, सहकार्यात्मक अध्ययन, सामाजिक संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ, राजकीय संदर्भ, अध्ययनार्थी समाजामध्ये सामाजिक

जाणिव, उद्‌गामी विश्लेषण, सामाजिक कौशल्ये, सामूहिक कार्ये, मूळ बाबी, स्त्रोत उगम, विमर्षी विचार, मुक्त प्रश्न, पृच्छाधारित या सामाजिक ज्ञानरचनावादाचे घटकांचे प्रतिबिंब पाठयपुस्तकाच्या बाहयांगातून व अंतरंगातून अल्प प्रमाणात दिसून येते.

जामुनी, एस.एस. (२०१३). इयत्ता नववीच्या इतिहास पाठयपुस्तकाचा सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अभ्यास या संशोधनातील इयत्ता नववीच्या इतिहास पाठयपुस्तकाचे विश्लेषण केल्यानंतर असे दिसून येते की इयत्ता नववी इतिहास पाठयपुस्तकात बोधात्मक ज्ञान, सहकार्यात्मक अध्ययन, कृतीशील अध्ययन, विमर्षी विचार, सामाजिक संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ, सामजिक आंतरक्रिया, सृजनशीलता, गटचर्चा, वर्गचर्चा, प्रकल्प पद्धती, समस्या निराकरण कृती, लोकशाही वातावरण, पूर्वज्ञानाशी संबंध, वास्तविक अनुभव, सहअध्ययन या सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांचे प्रतिबिंब आहे. या निष्कर्षाशी मिळताजुळता आहे.

**उद्दिष्ट क्र.३ इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या बाहयांगातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.**

इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकाच्या बाहयांगामधील पाठयपुस्तकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, पाठयपुस्तकाची बांधणी, पाठयपुस्तकाचा आकार, किंमत, पाठयपुस्तकाची प्रस्तावना, पाठयपुस्तकाची अनुक्रमणिका, बोलीभाषांचा परिचय, निबंधलेखन, व्याकरण यातून सामाजिक ज्ञानरचनावाद अल्प प्रमाणात प्रतिबिंबित होतो. तर परिशिष्टातून जास्त प्रमाणात प्रतिबिंबित होतो.

भोसले, एस.एच. (२००३). माध्यमिक स्तरावरील मराठी प्रथमभाषा पाठयपुस्तकाचे पाठयपुस्तक तंत्रज्ञानानुसार परीक्षण - एक अभ्यास. या संशोधनतील मराठी पाठयपुस्तकाचा आकार हाताळण्यायोग्य आहे, मराठी पाठयपुस्तकातील मुखपृष्ठ व मलपृष्ठ आकर्षक व प्रभावी आहेत या निष्कर्षाशी मिळताजुळता आहे.

उद्दिष्ट क्र.४ ते उद्दिष्ट क्र. १२ यावरून प्राप्त अनुमान एकत्र मांडण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे

**उद्दिष्ट क्र.४ ते उद्दिष्ट क्र. १२**

**इयत्ता नववी मराठी पाठयपुस्तकाच्या पाठपरिचय, आशय, शब्दार्थ, स्वाध्याय, व्याकरण, भाषाभ्यास, वाचन, उपक्रम, संवादकौशल्य यातून सामाजिक ज्ञानरचनावादानुसार प्रतिबिंबित होणा-या घटकांबाबतीत शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.**

इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकातील गद्य, पद्य विभागातील पाठपरिचय, आशय, शब्दार्थ, स्वाध्याय, व्याकरण, भाषाभ्यास, वाचन, उपक्रम, संवादकौशल्य यातून सामाजिक ज्ञानरचनावादाचे सर्व घटक अल्प प्रमाणात प्रतिबिंबित होतात. तर इयत्ता नववीच्या मराठी पाठयपुस्तकातील स्थूलवाचनातील पाठपरिचय, आशय, स्वाध्याय यातून सामाजिक ज्ञानरचनावादाचे सर्व घटक अल्प प्रमाणात प्रतिबिंबित होतात.

उद्दिष्ट क्र ४ ते १२ हे अंतरंगाशी निगडीत असल्याने इयत्ता नववीच्या मराठी विषय शिक्षकांनी दिलेल्या मतानुसार पाठयपुस्तकाच्या अंतरंगातून सामाजिक ज्ञानरचनावादाचे घटक अल्प प्रमाणात प्रतिबिंबत होतात हा निष्कर्ष वैद्य. अ.मु. (२०१२). इयत्ता आठवीच्या मराठी विषयाच्या ज्ञानरचना निर्मितीसाठी प्रश्नांच्या वापराचा चिकित्सक अभ्यास या संशोधनातील २००४ च्या प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमात बोधात्मक क्षेत्रातील उद्दिष्टांच्या तुलनेत भावात्मक क्षेत्रातील उद्दिष्टांना कमी प्रमाणात तर क्रियाकौशल्य क्षेत्रातील उद्दिष्टांना जास्त भारांश दिला आहे या निष्कर्षाशी व पठाण, बी. बी.(२००४). इयत्ता पहिली ते दहावीच्या प्रथमभाषा मराठी पाठयपुस्तकातील शब्दबद्ध व चित्रबद्ध स्त्री प्रतिमांचा चिकित्सक अभ्यास. यांनी माडलेल्या मराठी पाठयपुस्तकातून शब्दबद्ध स्त्री प्रतिमा या चित्रबद्ध स्त्री प्रतिमांपेक्षा अधिक दिसून येतात. तसेच गोंदकर, एस. व्ही.(२००३). माध्यमिक स्तरावरील विज्ञान पाठयपुस्तकाचे पाठयपुस्तक तंत्रज्ञानाच्या गणितीय प्रHŒया घटकानुसार परीक्षण या संशोधनातील माध्यमिक स्तरावरील विज्ञान पाठयपुस्तकात चिन्हांचा वापर योग्य

प्रमाणात केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मुख्य संकल्पना स्पष्ट होतात या निष्कर्षांशी मिळता जुळता आहे.

**५.३ सूचना :**

**उद्दिष्ट क्र.१३** पाठ्यपुस्तक मंडळ यांना सामाजिक ज्ञानरचनावादानुसार पाठ्यपुस्तक निर्मिती विषयी व पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अध्ययन पद्धतीची कार्यवाही करण्यासाठी सूचना देणे.

**शिक्षक :**

१. शिक्षकांनी सामाजिक ज्ञानरचनावादाच्या कार्यनीतींचा वर्गाध्यापनात अवलंब करावा.

२. शिक्षकांनी मराठी विषयाचे अध्यापन करताना सहकार्यात्मक कार्यनीती (गटचर्चा, बुध्दिमंथन) चा प्रत्यक्ष अध्यापनात अवलंब करावा.

३. शिक्षकांनी कृतीयुक्त अध्यापनाकरिता प्रकल्प, क्षेत्रभेट, सामाजिक सहभाग या सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकानुसार अध्यापन करून विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग घ्यावा.

४. वर्गात सामाजिक आंतरक्रिया घडवून आणण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग घ्यावा.

**शासन :**

१. सामाजिक ज्ञानरचनावादाच्या वापराबाबत मराठी शिक्षकांना प्रशिक्षण दयावे.

२. सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांची माहिती देण्यासाठी तज्ज्ञ व्याख्यानांचे आयोजन करावे.

३. सामाजिक ज्ञानरचनावादाच्या कार्यनितींच्या प्रत्यक्ष वापराचे प्रशिक्षण देण्यासाठी कृतीसत्राचे आयोजन करावे.

**विद्यार्थी**

१. विद्यार्थ्यांनी सहकार्यात्मक अध्ययन कार्यनीतींचा वापर करून अध्ययन करावे.

२. विद्यार्थ्यांनी ज्ञानरचनेसाठी जास्तीत जास्त प्रत्यक्ष अनुभव घ्यावेत.

**पाठयपुस्तक निर्मिती मंडळ :**

१. पाठपरिचयात लेखकाच्या व्यक्तीमत्वाची व लेखन वैशिष्टयांची अधिक माहितीचा समावेश असावा.

२. विदयार्थ्यांच्या अभिव्यक्तीस वाव देणारा स्वाध्याय असावा.

३. सदय परिस्थितीवर आधारित पाठांचा समावेश करावा.

४. सृजनशीलता, नवोपक्रम, सामाजिक - राजकीय सहभाग, सहकार्यात्मक अध्ययन, चिकित्सक विचार या सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांना अनुसरून उपक्रमांचा पाठयपुस्तकात समावेश करावा.

५. विद्यार्थ्यांना कृतीयुक्त सहकार्याने अध्ययन करता येईल अशा प्रकारच्या स्वाध्यायाचा प्रत्येक प्रकरणात समावेश करावा.

६. मराठी विषयाच्या पाठयपुस्तकाची निर्मिती करताना विद्याार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग घेता येईल अशा उपक्रमांचा पाठयपुस्तकात समावेश करावा.

७. विद्यार्थ्यांच्या भाषिक शब्दसंपत्तीत वाढ होण्याकरिता शब्दार्थातून नवीन शब्दांचे जास्तीत जास्त अर्थ स्पष्ट करणा-या शब्दांच्या स्पष्टीकरणाचा समावेश असावा

८. विद्यार्थ्यांची सृजनशीलता वाढीस लावण्यास पूरक आशयाचा समावेश पाठातून करावा.

## ५.४ पुढील संशोधनासाठी विषय

१. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांकरिता सामाजिक ज्ञानरचनावादाच्या कार्यनीतींचे विकसन - एक अभ्यास

२. इयत्ता नववी मराठी विषयाच्या अध्यापनाकरिता सहकार्यात्मक कार्यनीतीची परिणामकारकतेचा अभ्यास.

३. माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या पाठयपुस्तकातून प्रतिबिंबित होणा-या सामाजिक ज्ञानरचनावादाच्या घटकांचा चिकित्सक अभ्यास.

४. इयत्ता आठवीच्या मराठी विषयाच्या वर्गाध्यापनातील पारंपारिक अध्यापन पद्धती व सामाजिक ज्ञानरचनावाद अध्यापन पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास.

५. सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अध्यापन करताना येणा-या अडचणींचा अभ्यास.

६. मराठी विषयाचे अध्यापन करताना प्रतिबिंबित होणा-या शिक्षक भूमिकांचा अभ्यास.

७. इयत्ता नववीच्या वर्गाध्यापनाचा सामाजिक ज्ञानरचनावादानुसार अभ्यास.